महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३१६ वा दिनांक : १५/१०/२०२५ वार : बुधवार

## राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संघटनात्मक बदल : पक्षाकडून संघटन बळकटीकरणावर भर



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज संघटनात्मक पुनर्रचनेच्या दिशेने आणखी एक निर्णायक पाऊल उचलत पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विधानपरिषद सदस्य संजय खोडके यांची 'संघटन महासचिव' म्हणून नियुक्ती केली. पक्षात सुरू असलेल्या नव्या घडामोडी आणि संघटन बळकटीकरणाच्या प्रयत्नांचा हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रवादी काँग्रेसकडून 'राष्ट्रवादी चिंतन शिबिर' आणि 'राष्ट्रवादी परिवार मिलन' सारख्या उपक्रमांद्वारे पक्षातील संवाद आणि तळागाळातील संपर्क वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यात आता 'संघटन महासचिव' या नव्या पदनिर्मितीमुळे संघटनेतील अडथळे कमी करून संवाद अधिक परिणामकारक करण्यास मदत होणार आहे. संजय खोडके यांची या पदावर नियुक्ती झाल्याने कार्यकर्त्यांना त्यांच्या अडचणी आणि सूचना थेट पक्ष संघटनेपर्यंत पोहोचविण्याचे एक निश्चित माध्यम मिळणार आहे.

एनएससीआय, वरळी येथे आज झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत सर्व आमदार आणि जिल्हाध्यक्ष सहभागी झाले होते. या बैठकीत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या संघटनात्मक तयारीचा रोडमॅप ठरविण्यावर चर्चा झाली. 'राष्ट्रवादी कनेक्ट' या नव्या मोबाईल ॲपच्या माध्यमातून एकसंध संवादयंत्रणा आणि कार्यकर्त्यांमधील समन्वय अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जिल्हा पातळीवर नियमित 'राष्ट्रवादी परिवार मिलन' कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा आराखडा देखील आज झालेल्या बैठकीत मांडण्यात आला. तसेच प्रत्येक बूथ स्तरावर संघटन मजबूत करणे, आमदार व जिल्हाध्यक्ष यांच्यातील संवाद सुलभ करणे आणि सर्व स्तरावर निवडणूक नियोजन समन्वयपूर्वक राबविण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

बैठकीदरम्यान शिस्त, संघभावना आणि जबाबदारी ही प्रत्येक कार्यकर्त्याची मूलभूत मूल्ये राहतील, हा पक्ष नेतृत्वाचा संदेश पुन्हा एकदा ठळकपणे देण्यात आला. या सत्रात राज्य व जिल्हास्तरीय यंत्रणेतील समन्वय वाढविणे, संघटनात्मक उपक्रमांचे मूल्यमापन करणे आणि पुढील काही महिन्यांसाठी संवाद व जनसंपर्काचे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करणे यावर सविस्तर विचारमंथन झाले.

## मनसेकडून युतीचा कोणताही प्रस्ताव आलेला नाही : हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महाविकास आघाडीत सामील करून घेण्याच्या चर्चेला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विराम दिला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासोबत दिल्लीत भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी बोलताना सपकाळ यांनी स्पष्ट केले की, मनसेकडून युतीचा कोणताही प्रस्ताव आलेला नाही, त्यामुळे सध्या यावर चर्चा करणे 'जर-तर'च्या प्रश्नासारखे निरर्थक आहे. अशा प्रकारच्या आघाडीची कोणतीही चर्चा सुरू झालेली नाही. काँग्रेसच्या भूमिकेनुसार, ही आघाडीची चर्चा फक्त इंडिया आघाडीच्या विद्यमान भागीदारांसोबतच पुढे जाऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

मनसेच्या युतीचा निर्णय स्थानिक पातळीवर घेण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे का, या प्रश्नावर हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले की, काँग्रेसने इंडिया आघाडीच्या आणि मविआच्या सहकारी पक्षांना जिल्हा स्तरावर आणि स्थानिक पातळीवर चर्चा करण्यास सांगितले आहे. राज्य स्तरावर आम्ही कुठलीही आघाडी किंवा युती करणार नाही. स्थानिक पातळीवरच्या निवडणुकांबाबत निर्णय घेण्याची जबाबदारी स्थानिक पातळीवरच सोपवलेली आहे. मनसेच्या प्रस्तावाबाबत टोलवाटोलवी सुरू आहे का, या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी "अद्याप प्रस्तावच आलेला नाही त्यामुळे टोलवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही," असे स्पष्ट केले.

हर्षवर्धन सपकाळ यांनी मनसेला सोबत न घेण्यामागील कारण स्पष्ट करताना इंडिया आघाडीच्या स्थापनेची मूळ तत्त्वे अधोरेखित केली. ते म्हणाले, इंडिया आघाडीची स्थापना भाजपला दूर ठेवून संविधानाचे संरक्षण, संवर्धन करणे आणि भाजपची हुकूमशाही हाणून पाडणे या दोन प्रमुख कारणांसाठी झाली आहे. या मूल्यांवर ज्या पक्षांचा विश्वास आहे, ते सर्वजण इंडिया आघाडीचे घटक आहेत. त्यामुळे, नव्या पक्षाला आघाडीत घ्यायचे असल्यास, केवळ काँग्रेस नव्हे तर राष्ट्रीय स्तरावरील इतर सर्व मित्रपक्षांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेतला जाऊ शकतो, असे सपकाळ यांनी नमूद केले.

## मतदार यादीत बदल करण्याचा अधिकार नाही : राज्य निवडणूक आयुक्त

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरली जाणारी विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीत नव्याने नावे समाविष्ट करणे किंवा नावे वगळण्याची कार्यवाही किंवा अन्य बदल करण्याचा विषय राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही, असे स्पष्टीकरण राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज येथे केले.

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आयोगाच्या कार्यालयात आज बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

वाघमारे यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी लागू असलेल्या अधिनियमांच्या तरतुदीनुसार भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदारसंघाची यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांसाठी जशीच्या तशी वापरली जाते. त्यासाठी अधिसूचित दिनांक निश्चित केला जातो. त्यानुसार १ जुलै २०२५ या अधिसूचित दिनांकाला अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहेत. प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुका, मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील दुरूस्त्यांबाबत हरकती व सूचना मतदार दाखल करू शकतात.

प्रचारकांची संख्या मर्यादा वाढण्याबाबत विचार

प्रमुख प्रचारकांच्या संख्येत आणि उमेदवारांच्या निवडणूक खर्चात वाढ करण्याची मागणी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी बैठकीत केली. त्यानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांच्या संख्येची मर्यादा २० वरून ४० करण्याबाबत विचार करण्यात येईल; तसेच उमेदवारांच्या निवडणूक खर्चातही यथोचित वाढ करण्याबाबत आयोग योग्य तो निर्णय घेईल, असे वाघमारे यांनी सांगितले.

संकेतस्थळावर शोधा मतदार यादीतील नाव

निवडणुकीच्या पूर्व तयारीसंदर्भात माहिती देताना काकाणी म्हणाले की, राज्यातील सर्व २९ महानगरपालिका, २४६ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती, ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची तयारी सुरू आहे. सध्या प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्रारूप किंवा अंतिम मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी https://mahasecvoterlist.in/ हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याचबरोबर मतदार यादीची छायांकित प्रत संबंधित ठिकाणी उपलब्ध असेल. त्यासाठी प्रतिपृष्ठ दोन रुपयेप्रमाणे शुल्क भरावे लागेल. विनाछायाचित्राची पीडीएफ प्रत https://mahasecvoterlist.in/ObjectionOnClick/DownloadVoterlist या संकेतस्थळावर मोफत उपलब्ध आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ ऑक्टोबर २०२५


## विद्यापीठ स्तरीय अंतर महाविद्यालय वैचारिक लेख स्पर्धेत पायल कांबळे प्रथम क्रमांक



**बीडकीन** : देवगाव (रं) येथील श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालयातील इतिहास विभाग अंतर्गत हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त' विद्यापीठ स्तरीय अंतर महाविद्यालयीन वैचारिक लेख स्पर्धेत कला महाविद्यालय बिडकीन ता. पैठण बी.ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. पायल गोरख कांबळे हिने प्रथम क्रमांक मिळविला. तिला इतिहास विभाग प्रमुख डॉ. सय्यद मुजीब यांनी मार्गदर्शन केले होते.

तिने 'हैदराबाद मुक्ती संग्रामात गोविंद भाई श्रॉफ यांचे योगदान' या विषयावर वैचारिक लेख सादर केला होता. तिच्या या यशाबद्दल कला महाविद्यालय बिडकीनचे प्राचार्य डॉ. आहेर नितीन, डॉ.युसूफ पठाण, इतिहास विभाग प्रमुख डॉ.सय्यद मुजीब, डॉ.काटकर अर्चना, डॉ. अंजली काळे, डॉ. मुंडे रामकिशन, डॉ. मोहसीन शेख, प्रा. मिलिंद ठोकळे व सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन करून तिचे कौतुक केले.

## महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने दि. १४ ऑक्टोबर रोजी क्रांतीचौक येथे मनुस्मृती दहन

**छत्रपती संभाजीनगर** : भारत रत्न, बोधिसत्व, कायदेपंडीत, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गलीच्छ शिव्या देणाऱ्या बाबासाहेबांबद्दल मनुवादी गरळ ओकणाऱ्या व सर न्यायाधिश भुषण गवई यांच्यावर कोर्टात बुट फेकणाऱ्या राकेश किशोर, अनिल मिश्रा, आनंद स्वरूप यांच्यावर तात्काळ देशद्रोहाचा व अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल करून अटक करा याबाबत महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने राहूल वडमारे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी १२.०० वा. क्रांतीचौक येथे लोकशाही मार्गाने आंदोलन करून मनुस्मृती दहण करण्यात आले आहे.







## शिवाजी महाविद्यालयात मानसशास्त्र विभागातर्फे कार्यशाळा संपन्न



**कन्नड (प्रतिनिधी)** : शिवाजी महाविद्यालय कन्नड मानसशास्त्र विभाग अंतर्गत एक दिवशीय मानसिक आरोग्य जनजागृती कार्यशाळेचे आयोजन १० ऑक्टोबर रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, समाजाचे सामाजिक स्वास्थ अबाधित रहाण्यासाठी मानसशास्त्राची नितांत गरज आहे. मानसिक आरोग्य चांगले असेल तर सामाजिक आरोग्य चांगले रहाते असे मत त्यांनी व्यक्त केले. सदरील कार्यशाळा तीन सत्रा मध्ये घेण्यात आली. पहिल्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य बाबत जनजागृती व मानसिक आरोग्य तपासून घेतले .दुसऱ्या सत्रामध्ये मानसिक आरोग्य जनजागृती संदर्भात एक लघु चित्रपट विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला. शेवटच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या संदर्भात समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ.घोती आर. एम. व डॉ. डी. डी. फड यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. विजय मातकर, प्रा. सोमेश्वर मोगरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ ऑक्टोबर २०२५


## घड्याळभाऊ

घड्याळभाऊ घड्याळभाऊ
गुण तुझे किती गाऊ
रात्रंदिवस तुझे
काटे लागतात धावू

तुझ्या तालावर
सर्वांची चालते धावपळ
तू बंद पडला की
होते सारी तारांबळ

ना तुला थकवा
ना तुला आराम
सर्वांना मंत्र देतोस
सतत करण्याचे काम

रात्रदिवस तुझी
सदा टिक् टिक् चाले
कंटाळा न करता
लोंबता लंबक हाले

काचे मधून चमकतात
अंक तुझे बारा
वेळेची महती सांगणारा
मित्र आमचा तू खरा




**रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## माझ्या गावाच्या भूमीत

माझ्या गावाच्या भूमीत
आज शिवराय आले
भेदभाव विसरुनी
मावळे एक झाले

आज जयंती राजाची
सण जसा रे दिवाळी
चरणावरती फुले
गगनातून उधळली

गाण्या स्वराज्य गीत
उभे कीर्तनकार
करूनी भजन कीर्तन
रुजवी शिवविचार

माझ्या गावात मंदिर
राम सीता लक्ष्मण
दोन्ही छत्रपतीसंगे
महादेव हनुमान

असे गाव माझे छान
नाही कमी आनंदास
वारसा राजांचा मिळे
इथं पुढच्या पिढीस

सोहळा शिवोत्सव छान
पाहे स्वर्गातील देव
जयंती निमित्त राजेंच्या
होई शुभेच्छा वर्षाव


**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड
मो.९४०३३८४८८९


## खेळ नशिबाचा

हातावरल्या रेघा आडव्या झाल्या कपाळावर
संसार आमचा मांडतो आम्ही रस्त्यावर
फिरत घर आमचं फिरत पोटपाणी
सुखदु:खाची नांदे आमच्या झोळीत गाणी

आयुष्याचं रडगऱ्हाण कसं गाळणार
नशिबाच्या पुढे आता कसं जाणार
आमची रटलेली चालवाट त्या वाटेवर अखंड घाट
जीवनाच्या संघर्षातून शोधावी लागते सुखाची वाट

रडत बसण्यापेक्षा जे आहे त्यात खुश राहू
नशीबी आलेले भोग गोड मानून भोगून पाहू
लेकरांच्या नव्या भविष्यासाठी
आयुष्याचे रडगऱ्हाणे आनंदाने गाऊ...


**लक्ष्मण वाल्डे**
**कन्नड**
जि.छत्रपती संभाजीनगर
मो.नं-८८८८६०६०६८



**एम.जे. न्यज चॅनल**

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002**


## पर्यावरणपूरक आकाशकंदीलांनी उजळली जिल्हा परिषद बहिरगाव शाळा!



**कन्नड (प्रतिनीधी) :** जिल्हा परिषद प्रशाला, बहिरगाव (ता. कन्नड) येथे कार्यानुभव विषयांतर्गत "पर्यावरणपूरक आकाशकंदील निर्मिती उपक्रम" उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी कागद व टाकाऊ वस्तूंचा वापर करून आकर्षक आणि पर्यावरणपूरक आकाशकंदील तयार केले.या उपक्रमात इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सर्जनशील कल्पना वापरून अवघ्या 15 रुपयांच्या खर्चात सुंदर कंदील साकारले.

त्यांच्या मेहनतीने तयार झालेले हे कंदील शाळेच्या वातावरणात दिवाळीचा आनंद, प्रकाश आणि उत्साह पसरवणारे ठरले.कलाशिक्षक सलीम आतार यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कौशल्य, स्वावलंबन आणि पर्यावरण-जाणिवा विकसित झाल्या.

या उपक्रमाचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप तसेच शिक्षक दिलीप महाजन, कुलभुषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, नुतन पवार , शाम खोसरे, सलिम आतार ,किरण पाटील, राधेशाम शर्मा, स्वप्नील गांगुर्डे, गणेश बल्हाळ, रविंद्र ठाकरे, किसनाबाई गोरे, सविता कुंटे या सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे मनापासून कौतुक केले.

संपूर्ण शाळा विद्यार्थ्यांच्या कलाकृतींनी आणि दिवाळीच्या रंगांनी उजळून निघाली.

## प्रा. वनविभागाचा उपक्रम, जनसंवादातून वन्यजीवांबद्दल जनजागृती




**कन्नड(अरुण थोरात):** जनतेत वन्यजीवांबद्दल असलेले गैरसमज, भीती दूर करण्यासाठी प्रादेशिक वनविभाग कन्नड च्या वतीने राबविण्यात येत असलेल्या जनसंवाद व सोशल मिडियातून जनजागृती, 'चाय पे चर्चा, जनजागृती का परचा' आदी उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून दि. १३ आक्टोंबर रोजी कन्नड तालुक्यातील जिल्हापरिषद उच्च प्राथमिक शाळा वडाळी येथे प्रा. वनपरिक्षेत्र अधिकारी शिवाजी टोम्पे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. वानर, हरिण, माकड इतर प्राण्यांना घरगुती अन्न पदार्थ देण्याचे दुष्परिणाम, बिबट्या च्या अधिवासात विद्यार्थी, नागरिकांनी घ्यावयाची काळजी, पिक नुकसान भरपाई व उपाययोजना आदी याबाबत माहिती दिली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक एल.बी. गवळी, शिक्षक श्री निकुंभ, श्रीमती साळुंखे, श्री चव्हाण, श्री चौधरी, वन कर्मचारी अशोक आव्हाड, भाऊसाहेब वाघ, यांची उपस्थिती होती. तसेच चिखलठाण येथील गुरुकृपा वस्तीशाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. याप्रसंगी शिक्षक शरद वेताळ, संगीता परसे, उपस्थित होत्या.डोणगाव, बहिरगाव, भोकनगाव, जैतखेडातांडा, भारंबा, भारंबातांडा येथील ग्रामपंचायत कार्यालय, शाळा आदी ठिकाणी जनजागृती स्वरुपातील माहितीपत्रके लावण्यात आली.


**प्रवेश सुरू**

**बी.ए. मराठी व उर्दू माध्यम**

**एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू**

**बालसंगोपन**

**डीप्लोमा गांधी विचार**

**मानवी हक्क प्रमाणपत्र**

**संपर्क**

**9405109103**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ ऑक्टोबर २०२५


## मुख्याध्यापकाने शिष्यवृत्ती चेकच्या नावाखाली पैसै लुटल्याची पालकांनी केली तक्रार



**खुलताबाद (सनिराम गावंडे)** खुलताबाद तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा निरगुडी बु येथील प्राथमिक शाळेत एस.टी.प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दर वर्षी शासन निर्णयानुसार "सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती" दिली जाते.

मात्र निरगुडी बु गावातील मुलांना या वर्षी मागील वर्षाच्या मुलांचे शिष्यवृत्ती चेक वाटप केले असता मुख्याध्यापक नलावडे यांनी प्रति मुलांच्या पालकांकडून १०० ते १५० रुपये घेतले होते अशी तक्रार पालकांनी शालेय समितीचे अध्यक्षीका मोनिका गोमलाडू यांच्याकडे केली होती तक्रार कळताच अध्यक्षीका शाळेत जावून मुख्याध्यापकांसोबत चर्चा केली व मुख्याध्यापक नलावडे यांनी १००ते १५० रूपये घेतल्याचे मान्य केले व ते पैसे शिष्यवृत्ती अर्जाचे व काही कागदपत्रांच्या झेरॉक्स काढण्याकरिता जमा केले होते असे सांगितले परंतू पालकांनी सांगितले की आम्ही सर्व कागदपत्रांची झेरॉक्स काढून दिल्या आहेत मग पैसे कशाकरिता जमा करत आहे? असा प्रश्न शालेय समितीच्या अध्यक्षीकाकडे मांडला शालेय समितीचे अध्यक्षीका मोनिका गोमलाडू यांनी सांगितले की आदिवासी ठाकर भिल्ल समाज हा गरीब समाज आहे.

शेत मजूरी, ऊसतोडी करुन उदरनिर्वाह करणारा समाज आहे या ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती च्या चेक साठी पैसे घेवू नये गेल्या वर्षी आलेल्या मुलांचे चेक व पैसे घेतलेल्या विद्यार्थ्यांची नावे अंकुश राजू कातवारे शालू सोमीनाथ कातवारे सोनल अनिल मोरे अजय बाजीराव गावंडे कृष्णा प्रकाश उघडे विजय बाजीराव गावंडे रवींद्र राजू कातवरे रूपाली प्रकाश उघडे पायल सोमीनाथ कातवारे अर्जुन पूनम मेंगाळ अस्मिता खंडू मधे सुनिता कोंडीबा मधे कविता गुलाब भांगारे स्वाती ढवळीराम मेंगाळ रिदम संतोष मधे संदीप साईनाथ डोके गणेश शेषराव कातवारे ममता प्रकाश उघडे संतोष बारकू कातवारे कावेरी राजुर कातवारे सती कैलास मोरे रवींद्र धनराज गायकवाड भारती सोमीनाथ मेंगाळ बुधाबाई साहेबराव मेंगाळ आरती खंडू मधे दिशा गणपत पारधे सदरील विद्यार्थ्यांचे पैसे मुख्याध्यापकने शालेय समितीचे अध्यक्षीका मोनिका गोमलाडू व ग्रामपंचायत चे ऑपरेटर दिपक चांडे यांच्या कडे परत केले आहे असे लेखी स्वरूपात दिले आहे तरी पालकांनी आपले पैसे परत घेऊन जावे व राहिलेली मुलांची शिष्यवृत्तीचे चेक घेण्यासाठी कोणीही परत पैसे देऊ नये व असे प्रकार पुन्हा घडल्यास शालेय समितीच्या कार्यकारणीस कळवावे असे शालेय समितीचे अध्यक्षीका मोणिका गोमलाडू यांनी पालकांना सांगितले.

## कळंकी येथील जि. प. प्रा. शाळेस जलशुद्धीकरण यंत्र भेट



**कन्नड (अरुण थोरात):** जि.प.प्राथमिक शाळा कळंकी येथील विद्यार्थी जय कदम याच्या वाढदिवसा निमित्त शाळेस जलशुद्धीकरण यंत्र भेट देऊन वाढदिवस शाळेत साजरा करण्यात आला.

या निमित्ताने विद्यार्थ्याचे पालक संदीप कदम, युवा उद्योजक निखिल कदम यांच्या तर्फे विद्यार्थ्यांची पाण्याची गैरसोय कमी व्हावी व मुलांना शुध्द पाणी उपलब्ध व्हावे. या उदात्त हेतूने शाळेला ही भेट देण्यात आली.

या प्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश थोरात यांनी पालकांचे आभार मानले, कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षक शिवाजी सारंग यांनी केले. दादासाहेब पोकळे, श्री आडे या नवीन शिक्षकांनी आपला परिचय दिला. यावेळी ग्रामस्त, ग्रामपंचायत पदाधिकारी, शिक्षणप्रेमी व मान्यवर उपस्थित होते.

शिक्षणप्रेमी पालक संदीप कदम यांचे स्वागत श्री पोकळे यांनी केले तर निखिल कदम यांचे स्वागत मुख्याध्यापक श्री राठोड यांनी केले. शाळेला आलेल्या भेटवस्तूचा स्वीकार शाळेचे शिक्षक बालाजी चोपणे यांनी करून आभार व्यक्त केले.याप्रसंगी उपसरपंच सोमा आगीवले, हरिश थोरात, रामेश्वर थोरात, दिपक गुंजेकर, दादा काटे, समाधान थोरात, प्रमोद थोरात आदी उपस्थित होते.






## मुरुमच्या महात्मा बसवेश्वर पतसंस्थेस सलग सहावा विभागीय दिपस्तंभ पुरस्कार...




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र राज्य सहकारी पतxसंस्था फेडरेशन, मुंबई आयोजित राष्ट्रीय प्रशिक्षण व दिपस्तंभ पुरस्कार वितरण सोहळा कर्नाटक राज्यातील गोकर्ण महाबळेश्वर कुमठा, डेनिसन्स रिसॉर्ट येथे आयोजित रविवारी (ता.१२) रोजी पार पडला.

यावेळी महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या विविध पतसंस्थांना राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार देण्यात आला. यामध्ये सन २०२४-२५ चा मुरुमच्या श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था चळवळीत दिपस्तंभाप्रमाणे सर्वोत्कृष्ट व दिशादर्शक कार्य केल्याबद्दल १० कोटी ते ५० कोटीच्या दरम्यान झालेला पारदर्शक व्यवहार, वाढते भागभांडवल, विविध योजना, सामाजिक योगदान व वसुली.

त्यांच्या या कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश कोयटे, माजी मंत्री शशिकला जोल्ले, माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले, महासचिव शशिकांत राजोबा, संचालक डॉ. संजय ओसमठ यांच्या हस्ते पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवशरण वरनाळे, उपाध्यक्ष शरणाप्पा मुदकण्णा, सचिव कमलाकर जाधव आदिंचा आकर्षक सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व मानाचा दुप्पटा देवून मराठवाडा विभागातून सहा वेळा दिपस्तंभ पुरस्कार देवून मान्यवरांनी सन्मानित केले.

सदर पतसंस्थेला या अगोदर पाच वेळा पुरस्काराने सन्मानित करण्यात येवून हा सहावा पुरस्कार प्राप्त झाला आहे. या त्यांच्या अविस्मरणीय यशाबद्दल संस्थेचे सर्व संचालक, सभासद, कर्मचारी वृंद आदिंनी फटाके वाजवून व गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा करून त्यांचे विशेष अभिनंदन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ ऑक्टोबर २०२५


## सुनिल राठोड यांच्याकडून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित्ताने शालेय साहित्याचे वाटप...



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : केसरजवळगा, ता. उमरगा येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत रोटरी क्लब मुरूम सिटीचे माजी सचिव रोटे. सुनिल राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी इयत्ता पहिली ते चौथी, पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे शालेय साहित्याचे वाटप मंगळवारी (ता. १३) रोजी करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संदीप पाटील होते. यावेळी रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, सचिव कल्लापा पाटील उपस्थित होते. सहशिक्षक सुनिल राठोड यांचा प्रशालेच्यावतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. धम्मभूषण कांबळे यांनी आपल्या सुमधूर आवाजात मैत्रीगीत सादर करून एकतेचा संदेश दिला.

शाळेतील २५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन एक नवा पायंडा राठोड यांनी घातला. अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढदिवसाचे प्रस्थ असताना अवांतर खर्चाला फाटा देऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मदत देऊन मुलांच्या चेहऱ्यावर समाधान आणण्याचे काम केल्याची भावना यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बालाजी भोसले यांनी व्यक्त केली.

यावेळी गोविंद पाटील, मल्लिकार्जुन बदोले, संतोष कांबळे, कमलाकर मोटे, शिवा स्वामी, उपसरपंच जयपालसिंग राजपूत, माजी उपसरपंच शिवशंकर कणमुसे, अझहर इनामदार, माजी पोलीस उपनिरीक्षक राम कांबळे, तंटामुक्त समिती उपाध्यक्ष बिरबलसिंग राजपूत, गैभूशा मकानदार, बालाजी डिगोळे, चंद्रकांत कुंभार, विशाल गायकवाड, मल्लीनाथ स्वामी आदींची उपस्थिती होती. यावेळी मुरूमच्या कॉर्नर स्टील सेंटरचे शरणाप्पा धुम्मा यांच्याकडून पहिलीच्या ४० विद्यार्थ्यांना टिफीन बॅगचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी संजीव भोसले, गजानन खमीतकर, महादेव कुनाळे, साधना ताशी, वैभव पाटील, बालाजी डिगोळे, ज्योती जाधव, शुभांगी घोडके आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बालाजी भोसले तर आभार सचिव कल्लप्पा पाटील यांनी मानले.

## वारकरी शिक्षण संस्थेच्या संस्थापकावर लैंगिक शोषणाचा गुन्हा

**रत्नागिरी** : जिल्ह्यातील खेड तालुक्यात लोटे येथील एका वारकरी शिक्षण देणाऱ्या संस्थेमध्ये संस्थेचे संस्थापक भगवान कोकरे यांनी एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पीडित मुलीच्या तक्रारीनंतर खेड पोलीस स्टेशनमध्ये भगवान कोकरे यांच्यासह कार्यकारी अधिकारी प्रतेश कदम यांच्यावर पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी कोकरे यांना अटक केली आहे.

जून महिन्यापासून शोषणाचा आरोप

अल्पवयीन मुलीने दिलेल्या तक्रारीनुसार, जून महिन्यापासून संस्थापक भगवान कोकरे हे तिचे लैंगिक शोषण करत होते. या गंभीर गुन्ह्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. भगवान कोकरे यांच्यावर बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा अंतर्गत कलम १२ व १७ प्रमाणे, तसेच BNS ७४, ३५१(३), ८५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भास्कर जाधव यांचा भाजपवर गंभीर आरोप

या घटनेनंतर शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. भगवान कोकरे हे भाजपशी जोडलेले असल्याचा आरोप जाधव यांनी केला आहे. त्यांनी इशारा दिला की, ज्या नेत्यांनी गोशाळेत येऊन भाषणे केली, त्यांना आसमान दाखवणार. लवकरच सभा घेऊन भगवान कोकरे यांचा खरा चेहरा समोर आणणार असल्याचे जाधव म्हणाले. कोकरे यांनी अनेक मुलींचे लैंगिक शोषण केल्याचा गंभीर आरोपही जाधव यांनी यावेळी केला.

आळंदीतील वारकरी संस्थांची पार्श्वभूमी

दरम्यान, याच प्रकारच्या घटना पुणे जिल्ह्यातील आळंदी परिसरात देखील यापूर्वी समोर आल्या होत्या. आळंदीतील अनेक वारकरी संस्थांच्या वसतिगृहांमध्ये बालकांचे लैंगिक शोषण होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्या आदेशानुसार अनधिकृत वारकरी शिक्षण संस्थांची तपासणी सुरू करण्यात आली होती. आळंदीमध्ये जवळपास १७५ वारकरी शिक्षण संस्था आहेत, ज्यात ५ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यापैकी काही अनधिकृत संस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे शोषण होत असल्याच्या आरोपामुळे परिसर हादरला होता. आता रत्नागिरीतील या घटनेमुळे वारकरी शिक्षण संस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## १४ ऑक्टोबर वाढदिवस एका सामान्यातून असामान्य कर्तुत्व करणाऱ्या अवलिया व्यक्तिमत्त्वाचा





चापानेर तालुका कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर या छोट्याशा गावात जन्म घेतलेल्या एका सामान्य कुटुंबात कठीण आर्थिक परिस्थितीशी झगडून आपल्या स्वकर्तृत्वावर संयमी आयुष्य जगून शिक्षण क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणारे दशरथ गोरखनाथ सोमासे. राहणार चापानेर ,तालुका कन्नड, जिल्हा .छत्रपती संभाजी नगर यांचा जन्म दिनांक १४ ऑक्टोबर रोजी झाला.

वडिलांच्या आजारपणामुळे घरावर आलेल्या कठीण आर्थिक परिस्थितीत आई कस्तुराबाई यांनी तोंड देत आपल्या तीनही मुलांना सामाजिक ज्ञानासोबत आर्थिक विकासाचे धडे दिले. याच कुटुंबातील ज्येष्ठ म्हणजे

दशरथ सोमासे घरची कठीण आर्थिक परिस्थिती बघता काही काळ औरंगाबाद येथील एका मान्यता प्राप्त कंपनीत काम करून उदरनिर्वाह चालविला. त्यासोबतच समाजकारण राजकारण यातही हिरारीने भाग घेतला काही कालांतराने हे काम सोडावे लागल्यानंतर चापानेर परिसरात समाजकारणात स्वतःला झोकून दिले.

त्याच वेळी दैनिक लोकमत माध्यमातून परिसरातील सामाजिक शेतकऱ्यांच्या प्रश्नाला पत्रकारितेच्या माध्यमातून वाचा फोडली महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राष्ट्रवादी काँग्रेस या राजकीय पक्षांच्या तालुका युनिटलाही काम केले. याच दरम्यान साई सायली बहु.उद्दे.शिक्षण संस्थेची स्थापना करून

चापानेर येथे २००९ मध्ये पहिली इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करून परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून दिले .

आज या शाळेच्या माध्यमातून आतापर्यंत शेकडो विद्यार्थी इंग्रजी माध्यमातून प्राथमिक शिक्षण घेऊन तालुका आणि जिल्हास्तरावर विविध मान्यताप्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ,कॉलेजला शिक्षण घेत आहे याचवेळी कन्नड शहरांमध्ये काही समविचारी मित्रांना एकत्र करून दशरथ सोमासे सरांनी सरस्वती क्लासेस च्या माध्यमातून पहिली ते बारावी, आर्ट्स ,कॉमर्स सायन्स चे क्लासेस सुरू करून या क्षेत्रातही विद्यार्थ्यांना

सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली. आपल्या शाळेच्या माध्यमातून विविध नवीन उपक्रम राबवून तालुक्यामध्ये आतापर्यंत एक उपक्रमशील शाळा व क्लासेस सरांच्या कठीण प्रयत्नाने व मार्गदर्शनाने नावारूपाला आले. आर. जी. शिक्षण संस्थेचे विकास जीवरख यांच्या साथीने उच्च महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रातही सरांनी पदार्पण केले असून. २०२३ मध्ये जरूर तालुका वैजापूर येथे छत्रपती संभाजी राजे महाविद्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना बीई डिझाईनिंग या नवीन क्षेत्रात शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे.

येणाऱ्या काळात श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून केजी ते बारावी पर्यंतच्या शिक्षणाची सोय एकाच छताखाली करण्याचा मानस आहे.अशा या एका सामान्य कुटुंबातून आज शिक्षण क्षेत्रात नावारूपाला येणाऱ्या सर्वांशी मनमिळाऊ, संयमी ,धाडसी व्यक्तिमत्व म्हणजेच आम्हा सर्वांचे लाडके दादा आपणास वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा.


**शब्दांकन**

**संदिप नानासाहेब वाकडे**

रा.खेडा ता.कन्नड

जि.औरंगाबाद

मो. ९७६६९९२७७६


महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ ऑक्टोबर २०२५

# पांढरी काठी : दृष्टिहीनांच्या आत्मविश्वासाचा प्रकाशमार्ग


जगात डोळे हे ज्ञानाचे, अनुभूतीचे आणि ओळखीसाठीचे सर्वात सामर्थ्यवान माध्यम मानले जाते. परंतु या डोळ्यांशिवायही अनेक व्यक्ती जग पाहतात ते मनाच्या डोळ्यांनी, संवेदनांच्या माध्यमातून, अनुभवाच्या प्रकाशातून. या अशा दृष्टिहीन व्यक्तींच्या स्वावलंबनाचे, सन्मानाचे आणि सामाजिक समानतेच्या अधिकाराचे प्रतीक म्हणजे पांढरी काठी (White Cane) होय. म्हणूनच दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस ‘जागतिक पांढरी काठी दिन’ (World White Cane Day) म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ दृष्टिहीनांच्या सन्मानाचा नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या स्वातंत्र्यपूर्ण जीवनाचा आदर करावा, याची आठवण करून देणारा आहे.पांढऱ्या काठीचा इतिहास विसाव्या शतकाच्या आरंभीचा आहे. १९२१ मध्ये, इंग्लंडमधील ब्रिस्टॉल शहरातील छायाचित्रकार जेम्स बिग्स यांनी अपघातामुळे दृष्टी गमावली आणि रस्त्यावर सुरक्षितपणे चालण्यासाठी आपल्या चालण्याच्या काठीला पांढरे रंग लावले, ज्यामुळे ती वाहनचालकांना दिसू शकली. १९३१ मध्ये, फ्रान्समधील गिल्ली द'हर्बेमॉंट यांनी पांढऱ्या काठीचा वापर दृष्टिहीनांसाठी सुरू केला. १९३१ मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या एका समारंभात त्यांनी दोन पांढऱ्या काठी दृष्टिहीनांना दिल्या, ज्यात एक अंध सैनिक आणि एक अंध नागरीक होते. यानंतर ५,००० पांढऱ्या काठी फ्रान्समधील अंध सैनिक आणि नागरिकांना वितरित करण्यात आल्या. या घटनांमुळे पांढरी काठी दृष्टिहीनांसाठी एक महत्त्वपूर्ण चिन्ह बनली, ज्यामुळे त्यांची सुरक्षितता आणि स्वातंत्र्य सुनिश्चित करण्यात मदत झाली. या काठीचा रंग पांढरा ठरविण्यामागे एक समाजशास्त्रीय विचार होता तो म्हणजे पांढरा रंग म्हणजे प्रकाश, शांती, सन्मान आणि दृष्टीचे प्रतीक होय. हा रंग इतर वाहनचालकांना किंवा नागरिकांना दृष्टिहीन व्यक्ती असल्याची ओळख देतो. १९६४ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन यांनी अधिकृतरीत्या १५ ऑक्टोबर हा ‘White Cane Safety Day’ म्हणून जाहीर केला. पुढे तो दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर World White Cane Day म्हणून साजरा होऊ लागला. आज या दिवशी जगभरातील संस्था, सरकारे आणि स्वयंसेवी संघटना दृष्टिहीनांच्या स्वावलंबनासाठी कार्य करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करतात.पांढरी काठी ही केवळ चालण्याचे साधन नाही, ती स्वाभिमानाचे प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला आपल्या आजूबाजूच्या वातावरणाची जाणीव करून देणारी ही काठी त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. काठीच्या साहाय्याने ते रस्त्यांवर सुरक्षितपणे चालू शकतात, अडथळे ओळखू शकतात, दिशांचा अंदाज घेऊ शकतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर पांढरी काठी ही ‘स्वावलंबनाचे’ आणि ‘समानतेचे’ प्रतीक आहे. दृष्टिहीन व्यक्तीला मदतीवर अवलंबून राहावे लागत नाही, तर तो स्वतःच्या सामर्थ्याने समाजात मुक्तपणे वावरतो. हीच खरी ‘दृष्टी’ आहे त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाची, स्वातंत्र्याची आणि मानवी प्रतिष्ठेची.जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) अहवालानुसार, जगभरात सुमारे २८५ दशलक्ष लोक काही ना काही प्रकारच्या दृक्‌दोषाने ग्रस्त आहेत, त्यापैकी अनेक लोक पूर्णतः दृष्टिहीन आहेत. भारतातही दृक्‌दोषाचे प्रमाण चिंताजनक असून, अनेक लाख लोक विविध प्रकारच्या दृष्टिदोषाने प्रभावित आहेत. या परिस्थितीवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्था नेत्रदान, मोफत शस्त्रक्रिया, शिक्षण व रोजगार यासारख्या उपक्रमांद्वारे उपाययोजना करत आहेत. ग्रामीण भारतात अंधत्वाचे प्रमाण अधिक आहे, कारण आरोग्य सुविधा, जागरूकता आणि नेत्रोपचार या क्षेत्रांमध्ये अजूनही मोठी दरी आहे. राष्ट्रीय अंधत्व निर्मूलन कार्यक्रम (NPCB) अंतर्गत भारत सरकारने अनेक प्रयत्न सुरू केले आहेत. नेत्रदानाचे अभियान, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे, दृष्टिहीनांसाठी शिक्षण व रोजगारसंधी यावर लक्ष केंद्रीत केले जात आहे. परंतु समाजाच्या मानसिकतेत बदल घडविणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.आजचा काळ माहिती आणि तंत्रज्ञानाचा आहे, आणि या क्षेत्रात दृष्टिहीनांसाठी संधीचे नवे दरवाजे उघडले आहेत. ब्रेल लिपी, स्क्रीन रीडर सॉफ्टवेअर, टॉकिंग बुक्स, ऑडिओ-लायब्ररीज, ॲप-बेस्ड नेव्हिगेशन सिस्टम्स यामुळे दृष्टिहीन व्यक्ती आता शिक्षण, व्यवसाय, प्रशासन, संगणकशास्त्र, संगीत, कला, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांत पुढे जात आहेत. भारतातील नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर द एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ व्हिज्युअल डिसेबिलिटीज (NIEPVD), देहरादून हे संस्थान दृष्टिहीनांसाठी प्रशिक्षण, संशोधन व मार्गदर्शन पुरविते. महाराष्ट्रात हेलन केलर इन्स्टिट्यूट फॉर ब्लाइंड, नाशिक ब्लाइंड स्कूल, पुण्यातील नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड अशा संस्था दृष्टिहीनांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक समावेशनासाठी कार्यरत आहेत.‘पांढरी काठी’ ही अनेक देशांत कायद्याने मान्यता प्राप्त आहे. भारतात Rights of Persons with Disabilities Act, 2016 अंतर्गत दृष्टिहीन व्यक्तींना शिक्षण, रोजगार, वाहतूक, सार्वजनिक सुविधा आणि मतदानाचा समान अधिकार दिला आहे. सार्वजनिक ठिकाणी ब्रेल संकेत, साउंड सिग्नल्स, स्पर्शवाचक नकाशे, आणि सुरक्षित पादचारी मार्ग या सुविधा पुरविणे ही सरकारची जबाबदारी ठरविण्यात आली आहे. पांढरी काठी वापरणाऱ्या व्यक्तींचा सन्मान राखणे हे केवळ कायदेशीर नव्हे, तर नैतिक कर्तव्य आहे. पादचारी किंवा वाहनचालकांनी रस्त्यावर पांढरी काठी पाहिली, तर त्यांनी थांबून त्या व्यक्तीला सुरक्षित मार्ग द्यावा, हा ‘White Cane Safety’ चा मूलभूत नियम आहे.समाजातील अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह हे दृष्टिहीनांच्या प्रगतीसमोरील सर्वात मोठे अडथळे आहेत. ‘अंधत्व म्हणजे अपंगत्व नव्हे’, हे जनमानसात रुजविणे आवश्यक आहे. दृष्टिहीन व्यक्ती आपल्या संवेदना, बुध्दी आणि प्रतिभेच्या जोरावर समाजाचे महत्त्वाचे घटक ठरू शकतात, हे अनेक उदाहरणांनी सिद्ध केले आहे. जगप्रसिद्ध पियानिस्ट रे चार्ल्स, गायिका स्टीव्ही वंडर, भारतातील डॉ. बेनजामिन दोरिसवामी किंवा दीपक महालांकर यांसारख्या व्यक्तींनी अंधत्वावर मात करून जीवनाचे नवे आदर्श निर्माण केले. हे सर्व दाखवून देतात की काठीचा रंग पांढरा असला तरी त्या मागचा आत्मविश्वास मात्र तेजस्वी आहे.जागतिक पांढरी काठी दिन (World White Cane Day) हा केवळ स्मरणदिन नाही; तो एक जागरूकता चळवळ आहे. या दिवशी शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध उपक्रमांद्वारे जनजागृती करतात. जसे की दृष्टिहीनांसाठी वॉकाथॉन, पांढऱ्या काठीच्या रॅली, सार्वजनिक परिसंवाद, कार्यशाळा आणि प्रेरणादायी कार्यक्रम. याचा हेतू समाजाला सांगणे हा आहे की दृष्टिहीन व्यक्ती दया किंवा सहानुभूतीच्या नाही, तर सन्मानाच्या पात्र आहेत.शेवटी, पांढरी काठी ही अंधत्वाचे प्रतीक नाही, तर मानवी दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. ती अंधारातही आशेचा दिवा प्रज्वलित करते, निर्बंधांना आव्हान देते आणि प्रत्येक दृष्टिहीन व्यक्तीला स्वतःच्या सामर्थ्यावर चालण्याची प्रेरणा देते.जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात, प्रत्येक रस्त्यावर, प्रत्येक मनात जर आपण पांढऱ्या काठीला सन्मानाने वाव दिला, तर ते समाज म्हणून आपल्या प्रगल्भतेचे द्योतक ठरेल. जागतिक पांढरी काठी दिन हा आपल्याला शिकवतो की दृष्टी फक्त डोळ्यांत नसते; ती मनात, आत्म्यात आणि माणुसकीत असते. म्हणूनच या १५ ऑक्टोबरला, पांढऱ्या काठीचा सन्मान करा, दृष्टिहीनांच्या हक्कांचा आदर करा आणि समाजात ‘दृष्टी’ म्हणजेच ‘संवेदना’ हा खरा प्रकाश आहे, ही जाणीव पसरवा.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)***
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**ईमेल –**
**bagate.rajendra5@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ ऑक्टोबर २०२५


# ‘वाचाल तर वाचाल’ - वाचन संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचा संकल्प



विज्ञान, नवनिर्मिती आणि राष्ट्रसेवेचा संगम असलेल्या महान व्यक्तिमत्त्वाचा म्हणजे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन. जो महाराष्ट्र सरकारने ‘वाचन प्रेरणा दिन’ म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ही केवळ औपचारिक घोषणा नसून, आजच्या पिढीला पुन्हा एकदा वाचनाकडे वळविण्याचा आणि विचारांच्या ज्योतीला प्रज्वलित करण्याचा हा प्रयत्न आहे.

आजचा काळ डिजिटल व आधुनिक जगाचा आहे. स्मार्टफोन, टॅबलेट, कॉम्प्युटर आणि सोशल मीडियाच्या झगमगाटात माणूस माहितीच्या महासागरात हरवून गेला आहे; शिवाय माणसाला ज्ञानाच्या गाभ्यापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक असलेली सखोलता, चिंतनशीलता आणि आकलनशक्ती यांचा अभाव या पार्श्वभूमीवर ‘वाचन प्रेरणा दिन’ ही कल्पना अत्यंत समयोचित आणि उपयुक्त आहे.

शाळा-महाविद्यालये, विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण करणे हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे. पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन साहित्य, विज्ञान, समाज, इतिहास, संस्कृती, निसर्ग आणि तंत्रज्ञान यांसारख्या विविध विषयांवर वाचन करणे ही खरी शिक्षणाची गुरुकिल्ली आहे. वाचनामुळे कल्पकता वाढते, भाषिक अभिव्यक्ती विकसित होते, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे विचारांना दिशा मिळते. “वाचाल तर वाचाल” हे सूत्र आजही तेवढेच सत्य आहे, किंबहुना अधिकच आवश्यक ठरले आहे.

डॉ. कलाम यांच्या आयुष्यात वाचनाचे स्थान केवळ छंदापुरते नव्हते; ते त्यांच्या व्यक्तिमत्त्व घडविण्याचे साधन होते. बालपणीच्या साध्या परिस्थितीत त्यांनी विविध विषयांवरील पुस्तके वाचून आपला दृष्टीकोन विस्तृत केला. नंतरच्या काळात त्यांनी तरुणांना नेहमीच प्रेरित केले. ते म्हणतात, *“Dream, dream, dreams transform into thoughts and thoughts result in action.”* स्वप्न पाहा, कारण स्वप्नं विचारांमध्ये रूपांतरित होतात, आणि विचार कृतीत परिवर्तित होतात. हे स्वप्न पाहण्याचे सामर्थ्य वाचनातूनच येते. वाचन म्हणजे केवळ माहिती मिळविणे नव्हे, तर विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची शक्ती विकसित करणे होय.

जगभरात वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. "वाचन कट्टा" हा एक सामाजिक आणि बौद्धिकरित्या समृद्ध करणारा उपक्रम आहे, जो भारतात आणि इतर अनेक देशांमध्ये लोकप्रिय होत आहे. डिजिटल युगातही वाचन संस्कृती टिकवण्यासाठी ऑनलाइन पुस्तक चर्चा, ई-ग्रंथालये आणि वाचन गट यासारखे उपक्रम उपयुक्त ठरत आहेत.

जगभरातील वाचन संस्कृती विकसनासाठी वाचन कट्टा उपक्रम ऑक्सफर्ड, केंब्रिज विद्यापीठ (यूके) येथे विद्यार्थ्यांसाठी बुक क्लब्स आणि रीडिंग सर्कल्स आहे, जिथे विशिष्ट साहित्यिक कादंबऱ्या, संशोधन पेपर्स किंवा समकालीन लेखनावर चर्चा होते. विद्यापीठीय ग्रंथालयांमध्ये वाचन तास आणि लेखकांसोबत संवाद कार्यक्रम घेतले जातात. हार्वर्ड आणि एमआयटी (अमेरिका) येथे "Great Books Program" नावाचा उपक्रम चालतो, ज्यात जगातील महान साहित्यिक कृत्यांचे वाचन आणि त्यावरील चर्चा केली जाते. काही विभागांतून वाचन गट तयार करून, विषयानुरूप पुस्तकांची देवाणघेवाण केली जाते. भारतात सुद्धा लिटरेचर फेस्टिवल विविध ठिकाणी भरवले जातात.

त्यामध्ये हा उपक्रम आवर्जून असतो. ग्रंथ हा ज्ञानाचा अथांग सागर असून, त्यातून मिळणारे विचार, अनुभव, आणि ज्ञान आपल्या जीवनाला समृद्ध करतात. तर वाचन हे माणसाच्या बौद्धिक आणि मानसिक विकासाला चालना देतात. वाचन संस्कृती हा प्रत्येक देशाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये वाचन कट्टा, पुस्तक क्लब, सार्वजनिक वाचनालये, डिजिटल वाचन मंच आणि वाचन प्रेरणा उपक्रम यांचा समावेश होतो.

पण हा दिवस एका कार्यक्रमापुरता मर्यादित राहू नये; तर तो आपल्या दैनंदिन आयुष्यातील सवयीचा भाग बनायला हवा. वाचन ही सवय जर घराघरात रुजली, तर समाजात विचारशीलता, विवेक आणि सहिष्णुता यांची वाढ होईल. आज गरज आहे ती “माहितीच्या युगातून ज्ञानाच्या युगाकडे” जाण्याची आहे. व या प्रवासाची पहिली पायरी म्हणजे वाचन. प्रत्येक शाळेने, पालकाने, नागरिकाने वाचन संस्कृती जपण्याचा संकल्प करणे हीच डॉ. कलाम यांना खरी आदरांजली ठरेल. व खऱ्या अर्थाने वाचन प्रेरणा दिन हा केवळ दिनदर्शिकेतील एक उपक्रम दिवस नसणार तर तो विचारांच्या पुनर्जागरणाचा प्रारंभ करण्याचा दिवस ठरेल.




**डॉ. सुनील भारोडकर**
**नाशिक**
**मो. ९१५८३५५०९३**



